<u>न्यायदंडाधिकारी वर्ग १ देवरुख यांचे न्यायालयात, मुक्काम देवरुख, ता. संगमेश्वर, जि. रत्नागिरी</u>.

नि.फौ.खटला क्र. ७०/२०२५

नि.क्र. ०८

**<u>दोषारोपपत्र</u>**

**<u>मी, श्रीमती आर. आर. कुलकर्णी, प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी देवरुख, याद्वारे तुमच्यावर आरोप निश्चित करीत आहे की</u>,**

**आरोपीचे नाव** – मुरलीधर श्रीधर खेडेकर,
**वय** – ३३ वर्षे,
**व्यवसाय** – ए.सी. मेकॅनिक,
**<u>राहणार</u>** – मौजे मुरादपुर वरचीवाडी,
ता. संगमेश्वर, जि. रत्नागिरी.

**यांचेवर खालील प्रमाणे दोषारोप ठेवणेत येतो की,**

तुम्ही या न्यायालयाच्या स्थळसिमेत दिनांक २२/०४/२०२५ रोजी २०.०० वाजताच्या सुमारास तुंम्ही तुमच्या ताब्यातील हिरो कंपनीची मोटार सायकल नंबर एम.एच. ०९/ डीपी / ७००२ ही गाडी रस्त्याची विशीष्ठ परीस्थीती लक्षात न घेता गाडी हयगयीने, निष्काळजीपणे व बेदरकारपणे चालवून मौजे देवरुख ते मार्लेश्वर रोडने चालवित घेवुन जात असताना मौजे मुरादपुर, ता. संगमेश्वर, जि. रत्नागिरी येथील निलेश रमेश बांडागळे यांचे राहते घरासमोर रोडवर आले वेळी देवरुख बाजूकडून रस्त्याने चालत जाणारे पादचारी आत्माराम भागोजी गोंधळी, वय ६४ वर्षे, रा. मौजे मुरादपुर वरचीवाडी, ता. संगमेश्वर, जि. रत्नागिरी यांना ठोकर दिलीत व त्यांना लहान मोठ्या गंभीर दुखापती होवुन त्यांच्या मृत्यूस कारणीभूत झालात, म्हणून तुम्ही **<u>भारतीय न्याय संहिता, २०२३ कलम १०६ (१)</u>** अन्वये, माझ्या न्यायिक कार्यक्षेत्रात गुन्हा केला आहे व जो मी दखल घेण्यास पात्र आहे.

दुसरे असे की, वरील तारखेला, वेळेला आणि ठिकाणी, तुम्ही तुमच्या ताब्यातील हिरो कंपनीची मोटार सायकल नंबर एम.एच. ०९/ डीपी / ७००२ ही गाडी मौजे देवरुख ते मार्लेश्वर रोड येथे रस्त्याची विशीष्ठ परीस्थीती लक्षात न घेता गाडी हयगयीने, निष्काळजीपणे व बेदरकारपणे मानवी जीवन धोक्यात येईल किंवा इतर कोणत्याही व्यक्तीला दुखापत होईल अशा रीतीने चालविली, म्हणून तुम्ही **भारतीय न्याय संहिता, २०२३ कलम २८१** अन्वये, माझ्या न्यायिक कार्यक्षेत्रात गुन्हा केला आहे व जो मी दखल घेण्यास पात्र आहे.

तिसरे असे की, वरील तारखेला, वेळेला आणि ठिकाणी, तुम्ही तुमच्या ताब्यातील हिरो कंपनीची मोटार सायकल नंबर एम.एच. ०९/ डीपी / ७००२ ही गाडी रस्त्याची विशीष्ठ परीस्थीती लक्षात न घेता गाडी हयगयीने, निष्काळजीपणे व बेदरकारपणे चालवून मौजे देवरुख ते मार्लेश्वर रोडने चालवित घेवुन जात असताना मौजे मुरादपुर, ता. संगमेश्वर, जि. रत्नागिरी येथील निलेश रमेश बांडागळे यांचे राहते घरासमोर रोडवर आले वेळी देवरुख बाजूकडून रस्त्याने चालत जाणारे पादचारी आत्माराम भागोजी गोंधळी, वय ६४ वर्षे, रा. मौजे मुरादपुर वरचीवाडी, ता. संगमेश्वर, जि. रत्नागिरी यांच्या लहान मोठया किरकोळ दुखापतीस कारणीभुत झालात म्हणून, तुम्ही त्याव्दारे **भारतीय न्याय संहिता, २०२३ कलम १२५ (अ) अन्वये,** माझ्या न्यायिक कार्यक्षेत्रात गुन्हा केला आहे व जो मी दखल घेण्यास पात्र आहे.

चौथे असे की, वरील तारखेला, वेळेला आणि ठिकाणी, तुम्ही तुमच्या ताब्यातील हिरो कंपनीची मोटार सायकल नंबर एम.एच. ०९/ डीपी / ७००२ ही गाडी रस्त्याची विशीष्ठ परीस्थीती लक्षात न घेता गाडी हयगयीने, निष्काळजीपणे व बेदरकारपणे चालवून मौजे देवरुख ते मार्लेश्वर रोडने चालवित घेवुन जात असताना मौजे मुरादपुर, ता. संगमेश्वर, जि. रत्नागिरी येथील निलेश रमेश बांडागळे यांचे राहते घरासमोर रोडवर आले वेळी देवरुख बाजूकडून रस्त्याने चालत जाणारे पादचारी आत्माराम भागोजी गोंधळी, वय ६४ वर्षे, रा. मौजे मुरादपुर वरचीवाडी, ता. संगमेश्वर, जि. रत्नागिरी यांच्या गंभीर दुखापतीस कारणीभुत

झालात म्हणून, तुम्ही त्याव्दारे **भारतीय न्याय संहिता, २०२३ कलम १२५ (ब) अन्वये,** माझ्या न्यायिक कार्यक्षेत्रात गुन्हा केला आहे व जो मी दखल घेण्यास पात्र आहे.

पाचवे असे की, वरील तारखेला, वेळेला आणि ठिकाणी, तुम्ही आरोपीने वरील वाहन अशा पद्धतीने चालवले जे प्रकरणातील सर्व परिस्थिती लक्षात घेता जनतेसाठी धोकादायक होते म्हणून तुम्ही, **मोटार वाहन कायदा, १९८८ कलम १८४ अन्वये,** माझ्या न्यायिक कार्यक्षेत्रात गुन्हा केला आहे व जो मी दखल घेण्यास पात्र आहे.

शेवटचे असे की, वरील तारखेला, वेळेला आणि ठिकाणी, तुम्ही आरोपीने तुमच्या ताब्यातील हिरो कंपनीची मोटार सायकल नंबर एम.एच. ०९/ डीपी / ७००२ ही गाडी वाहनाचा विमा संपलेला असताना बेकायदेशीररित्या सार्वजनिक ठिकाणी सदर वाहन चालविले म्हणून तुम्ही, **मोटार वाहन कायदा, १९८८ कलम १४६/१९६ अन्वये,** माझ्या न्यायिक कार्यक्षेत्रात गुन्हा केला आहे व जो मी दखल घेण्यास पात्र आहे.

**सदर गुन्हा माझे कार्यक्षेत्रातील असून तुमच्याविरुध्द या न्यायालयात खटला चालविला जाईल.**

ROHINI RAJENDRA KULKARNI Digitally signed by ROHINI RAJENDRA KULKARNI Date: 2025.09.03 16:06:20 +0530

**(रोहिणी आर. कुलकर्णी)**

**दिनांक – ०३/०९/२०२५** **प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी देवरुख,**

**स्थळ – देवरुख** **जि. रत्नागिरी.**

**प्रमाणपत्र**

आरोपीला आरोप पत्रातील मजकूर त्याच्या मातृभाषेत वाचून व समजावून सांगितला.

ROHINI RAJENDRA KULKARNI Digitally signed by ROHINI RAJENDRA KULKARNI Date: 2025.09.03 16:06:28 +0530

**(रोहिणी आर. कुलकर्णी)**

**दिनांक – ०३/०९/२०२५** **प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी देवरुख,**

**स्थळ – देवरुख** **जि. रत्नागिरी.**

-:CERTIFICATE:-

Charge in R.C.C. No.70/2025

I affirm that the contents of this Pdf file are same words as per original file.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | :- | K.V. Vaje (Jr. Clerk) |
| Court Name | :- | The Court of Judicial Magistrate F.C., Deorukh |
| Date | :- | 03/09/2025 |
| Plea signed by PO.on | :- | 03/09/2025 |
| Plea uploaded on | :- | 03/09/2025 |